# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.01.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- एक राष्ट्र एक निव्रडणूक, या संकल्पनेबाबत देशभरात चर्चा घडवून आणण्याचं पंतप्रधानांचं युवा पिढीला आवाहन
- राज्यात जीबीएसच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडून उच्चस्तरीय समिती नियुक्त
- देशातल्या पहिल्या फिरत्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेचं मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांना जाहीर
- आणि
- भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा तिसरा क्रिकेट सामना आज राजकोटमध्ये

**पंतप्रधान**

एक राष्ट्र एक निव्रडणूक, या संकल्पनेबाबत देशभरात चर्चा घडवून आणण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा पिढीला केलं आहे. नवी दिल्लीतल्या करीअप्पा परेड मैदानावर राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक रॅलीला त्यांनी काल संबोधित केलं. एनसीसीच्या यंदाच्या रॅलीची संकल्पना ‘युवा शक्ती, विकसित भारत’ अशी होती. देशाच्या विकासात युवा पिढीचं महत्त्वाचं योगदान असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं युवा पिढीसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी एनसीसीच्या छात्रांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**जीबीएस केंद्रीय पथक**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांची संख्या 111 झाली असून, त्यातले 16 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. राज्यातली ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने एक उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. सात सदस्यांच्या या समितीमध्ये राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ञांचा समावेश आहे. ही समिती राज्य सरकारला या आजाराच्या रुग्णांचं व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्यामध्ये मदत करेल. याचबरोबर राज्य सरकारच्या उपाययोजनांवरही लक्ष ठेवणार आहे.

**जीबीएस - अबिटकर**

दरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांनी काल पुण्यात जीबीएस या आजाराबाबत आढावा बैठक घेतली. या आजारातून बरे होणाऱ्या रुग्णाचं प्रमाण मोठं असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन आबीटकर यांनी केलं आहे. या आजारामागची कारणं शोधावीत, पाणीपुरवठा स्त्रोतांची, टँकरमधील पाण्याची तपासणी करावी, घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावं तसंच अन्य सर्वंकष उपाययोजना कराव्यात असे निर्देश आबीटकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले. जीबीएसच्या रुग्णांवर पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार असून; या ठिकाणी 45 खाटांचा विशेष विभाग तयार केला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश आबिटकर म्हणाले........

**मोबाईल फॉरेन्सिकव्हॅन**

गुन्हे सिद्ध करण्याकरता फिरत्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेची सुविधा सुरू करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत सह्याद्री अतिथीगृह इथं देशातल्या पहिल्या फिरत्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. राज्यात अशी 256 फिरती न्यायवैद्यक वाहनं तयार करण्यात येत असून त्यातल्या 21 वाहनांचं काल लोकार्पण झालं. केंद्र सरकारने लागू केलेल्या नव्या भारतीय साक्ष कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यातील पुराव्यांची न्यायवैद्यक पद्धतीने पुरावे गोळा करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. त्यासाठी ही न्यायवैद्यक वाहनं उपयुक्त ठरणार आहेत. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय पद्धतीने पुरावे गोळा करण्याची आणि ते साठवण्याची व्यवस्था करण्यात आल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

**आढावा**

राज्य सरकारच्या विविध विभागांनी 100 दिवसांत करायच्या कामांचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल घेतला. राज्यातील नद्यांचं प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी सातत्याने करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. त्याच बरोबर क्रीडा आणि युवक कल्याण विभाग, दिव्यांग कल्याण विभाग आणि दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या पुढील 100 दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी काल आढावा घेतला.

**प्रताप सरनाईक**

एस. टी. महामंडळाला येत्या 5 वर्षात स्व-मालकीच्या 25 हजार नव्या बस घेण्याच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी तत्वतः मान्यता दिली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल मुंबईत दिली.

दरम्यान एस.टी.ची भाडेवाढ रद्द करण्याची मागणी करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात काल ठिकठिकाणी आंदोलन केलं. त्या पार्श्वभूमीवर ही भाडेवाढ गरजेची होती असं स्पष्टीकरण सरनाईक यांनी दिलं आहे. याबाबत आकाशवाणीशी बोलताना ते म्हणाले-----

**जनस्थान**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ लेखक कुमार केतकर, कुसुमाग्रज फाऊंडेशनचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके, जनस्थान समितीचे अध्यक्ष विलास लोणारी यांनी काल नाशिक इथं पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. येत्या 10 मार्च रोजी गुरुदक्षिणा सभागृहात हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाईल. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**राम शिंदे**

राज्यातील विद्यापीठांमध्ये कला आणि नाट्यशास्त्र विभागांना अतिरिक्त निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी काल अहिल्यानगर इथं दिली. 100 व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. संमलेनाचे अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल, ज्येष्ठ रंगकर्मी प्रशांत दामले, मोहन जोशी, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. अहिल्यानगर इथं सांस्कृतिक संकुल उभारण्यासाठी लवकरच बैठक घेणार असल्याचं राम शिंदे यावेळी म्हणाले. गेले तीन दिवस रंगलेल्या या नाट्य संमेलनात नाट्यदिंडी, विविध नाट्यप्रयोग, नृत्य गायन असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

**तर्क तीर्थ लक्ष्मणशास्त्री**

थोर विचारवंत, मराठी विश्वकोशाचे माजी अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त वाईमध्ये प्राज्ञपाठशाळा मंडळात काल एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरील टपाल पाकिटाचं प्रकाशन पुणे विभागाचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये यांच्या हस्ते करण्यात आलं. प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या

अध्यक्ष डॉक्टर सरोजा भाटे, पत्रकार सारंग दर्शने यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सामाजिक समतेचा आग्रह धरून क्रांतिकारी बदल घडवण्याचं ध्येय ठेवलं; ज्ञानाची उपासना समाजाच्या उन्नतीसाठी असते हे त्यांनी दाखवून दिलं असं जायभाये यावेळी म्हणाले.

**स्वच्छता**

स्वच्छतेचे नियम न पाळणाऱ्या 52 हजारांहून अधिक नागरिकांवर पुणे महापालिका प्रशासनाने गेल्या वर्षभरात कारवाई केली आहे. यातून तीन कोटी 28 लाख रुपयांचा दंड वसूल केला असून गेल्या तीन वर्षातील ही सर्वात मोठी दंड वसुली असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली. ते म्हणाले ------

**निधन**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगांव नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, प्रगतशील शेतकरी सुधाकर कुलकर्णी यांचं काल वृध्दापकाळानं त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते 89 वर्षांचे होते.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातला 20 षटकांचा तिसरा क्रिकेट सामना आज राजकोटमध्ये होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत 2-0 नं आघाडीवर आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**